## Student Centric Activity




IKS महोत्सव

शस्त्रात्र प्रदर्शनास भेट









**आपले छत्रपती शिवाजी महाराज हे जगाचे छत्रपती झाले : प्रा. नितेश रायकर**

**बंधुता न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : जागतिक वारसा स्थळांमधील महाराष्ट्रातील १२ किल्ल्यांचा समावेश युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून केल्याने छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त महाराष्ट्राचेच नाही तर आत्ता जगाचे छत्रपती झाले असे प्रतिपादन मुरगुड येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्रा. नितेश रायकर यांनी केले. ते महावीर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग आयोजित विश्व पर्यटन दिनानिमित्त महाविद्यालयात बोलताना केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य गडकोटांबरोबरच मावळ्यांचे बलिदान, त्याग, प्रेम व राष्ट्रनिष्ठेवर उभारले. महाराष्ट्रातील गडकोटांचा संघर्ष आजही आपल्याला प्रेरणादायी असल्याचे मत इतिहास विभाग प्रमुख डॉ. महादेव शिंदे यांनी मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अंकुश बनसोडे यांनी केले, पाहुण्यांचा परिचय प्रा. चंद्रशेखर काटे यांनी केला, आभार डॉ. प्रदीप गायकवाड यांनी मानले तर सूत्रसंचालन दीक्षा काशिद, पूजा राठोड यांनी केले. यावेळी पोस्टर प्रदर्शनही करण्यात आले.

यावेळी प्रा. उत्तम वडिंगेकर, प्रा. पियुष डहाळे, प्रा. अमित पाटील, प्रा. सुरज चौगुले व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

**युनेस्को वारसा स्थळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेशानिमित्त व्याख्यान**

# Heritage Walk




नवीन राजवाडा भेट

शाहू जन्मस्थळ भेट








सावित्रीबाई फ़ुले जयंती निमित्त चित्रफित







**मराठा कालीन स्थापत्य कला यांची माहिती देताना प्रा. उत्तम वडींगेकर**







**राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त पोस्टर प्रदर्शन स्पर्धा**


## रायगड, प्रतापगड, जंजिरा शैक्षणिक सहल



# शिवजयंती व मोडी लिपी पोस्टर प्रदर्शन






# मोडी लिपी प्रशिक्षण






# सामजिक उत्तरदायित्व




सकाळ

## 'पुरालेखागार'चे स्वतंत्र अस्तित्व राखले जाईल

### जेल्हाधिकारी येडगे : रेकॉर्ड कार्यालय- 'सार्वजनिक बांधकाम'तर्फे बैठक

सकाळ वृत्तसेवा

ोल्हापूर, ता. २० : 'पुरालेखागार'चे स्वतंत्र अस्तित्व खले जाईल. पुरालेखागार कार्यालयाच्या संवर्धनाचा ाराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी ादर करावा, असे आदेश जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी ले. फायर ऑडिटनुसार त्वरित उपाययोजनेचे आदेश देत ्वतंत्र अभ्यासिका मंजूर करत असल्याचे त्यांनी सांगितले. तिहास तज्ज्ञ, संशोधक आणि अभ्यासकांच्या विनंतीनुसार जल्हाधिकारी श्री. येडगे यांनी दालनात पुरालेखागार हुजूर रेकार्ड ार्यालय आणि सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे संयुक्त ठक घेतली. यावेळी अभ्यासकांनी जिल्हाधिकाऱ्यांना विविध ागण्यांचे निवेदन दिले.


'पुरालेखागार'चे स्वतंत्र अस्तित्व राखले जावे, याबाबतचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देताना इतिहास तज्ज्ञ, अभ्यासक.

जुने वायरिंग नवीन करण्याचे ाणि डिजिटलायझेशन पूर्ण करा, नेक मागण्यांच्या पूर्ततेसाठी संबंधित चेवांशी संपर्क करून पाठपुरावा करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केले.

यावेळी प्राचार्य डॉ. विलास पोवार यांच्या अध्यक्षतेखालील शिष्टमंडळ उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता तुषार बुरुड, कार्यकारी अभियंता रोहित तोंदले, पुरालेखागारच्या सहायक संचालक दीपाली पाटील, संशोधक सहायक सर्जेराव वाडकर उपस्थित होते.

वैभवराज राजेभोसले यांनी संस्थान काळात १९३१ रोजी कोल्हापूरमध्ये हायकोर्ट, सुप्रीम कोर्ट स्थापन झाले, त्याचे नोटिफिकेशन याच कार्यालयातून शोधून ते आम्ही मुंबई हायकोर्टास ऐतिहासिक संदर्भीय ठोस पुरावा म्हणून दिला. त्यामुळे कोल्हापूरमध्ये हायकोर्ट होते हे सिद्धच झाले. यामुळे सर्किट बेंच मागणीला बळकटी मिळाल्याचे सांगितले. आदिलशाही काळापासूनची ते छत्रपती शिवराय, छत्रपती शाहू राजे, छत्रपती ताराराणी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अस्सल कागदपत्रे ते जुन्या काळातील नागरिकांच्या वंशावळी अशी कागदपत्रे येथे जतन केली जातात. त्यामुळे या वास्तूची सुरक्षा व्हावी, असे सांगितले.

फिरोज शेख यांनी ऐतिहासिक दस्तऐवजांचे क्लाऊड स्टोअरेज झाल्यावर राज्यातील संशोधक, अभ्यासकांना कनेक्टिव्हिटी द्यावी, अशी मागणी केली.

इतिहास संशोधक विकास नाईक, प्रा. उत्तम वडिंगेकर, प्रा. चंद्रशेखर काटे, मोडी तज्ज्ञ प्रशांत दळवी यांनी संशोधकांना स्वतंत्र अभ्यासिकेची मागणी केली. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता महेश कांजर यांनी कोल्हापूर पुरालेखागार संबंधित सुरू असलेल्या कामांची माहिती दिली.

#### डिजिटलायझेशन पूर्ण करा

■ प्राचार्य डॉ. विलास पोवार यांनी हुजूर रेकॉर्ड कार्यालय १८६५ च्या दरम्यान बांधलेली ब्रिटिशकालीन हेरिटेज वास्तू असून, याची जपणूक करत त्याचे स्वतंत्र अस्तित्व राखण्यासाठी पुरालेखागार कार्यालयाचा स्वतंत्र मार्ग पूर्वीप्रमाणेच ठेवून नवीन तहसील कार्यालयाच्या चारचाकी वाहनांच्या पार्किंगसाठी स्वतंत्र व्यवस्था करावी. ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटलायझेशन त्वरित पूर्ण करावे, याकडे जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

Kolhapur, Kolhapur-Today
21/08/2025 Page No. 2

कोल्हापूर, गुरुवार, १३ जानेवारी २०२२ पुढारी ३

## मादळे येथे ऐतिहासिक विहीर उजेडात

### छत्रपती राजाराम महाराजांच्या काळातील ठेवा; गावातील युवकांनी श्रमदानातून विहिरीचा परिसर केला मोकळा

कासारवाडी : उत्तम वडिंगेकर

मादळे (ता. करवीर) येथे छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात बांधण्यात आलेली ऐतिहासिक विहीर उजेडात आली आहे. गावातील युवकांनी श्रमदानातून विहिरीची स्वच्छता केल्याने ऐतिहासिक विहीर परिसरातील लोकांसाठी कुतूहलाचा विषय बनली आहे.

#### विहिरीच्या दगडावर कोरलेला मजकूर

इलाखा पंचायत करवीर ही विहीर श्री महाराज कर्नल सर राजाराम छत्रपती साहेब (जी.सी.आय.ई.जी.सी.एस.आय.) यांच्या कारकिर्दीत बांधण्यात आली. इ. सन १९३९ मादळे, खर्च इलाका पंचायत रु. १९१४.

येथील गावाच्या उत्तरेस असणाऱ्या जंगलात विहीर आहे. कित्येक वर्षांपासून ती दुर्लक्षित होती. ग्रामपंचायत सदस्य अमीर पटेल यांच्यासह आठ ते दहा युवकांनी उन्हाळ्यात येणारी पाण्याची समस्या जाणवू नये, यासाठी पाण्याचे स्रोत शोधत असताना ही दुर्लक्षित विहीर पाहिली. संपूर्ण विहीर झाडाझुडपांनी वेढलेली होती. दोन दिवस स्वच्छता करून विहिरीचा परिसर मोकळा केला. यावेळी त्या विहिरीवर सन १९३९ मधील छत्रपती राजाराम महाराजांचे नाव दगडावर कोरलेली पाटी निदर्शनास आली. विहिरीचे बांधकाम जुन्या दगडांमध्ये आहे.

> आपल्या जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. अनेक गावांत अशा ऐतिहासिक वास्तू आहेत. या वास्तूंचे युवकांनी जतन आणि संवर्धन करणे काळाची गरज आहे.
> - **प्रा. डॉ. महादेव शिंदे,** इतिहास विभागप्रमुख, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आणि नैसर्गिक जलस्रोत असलेली ही विहीर आहे. गावाला पिण्याचे पाणी मिळावे, याकरिता छत्रपती राजाराम महाराजांनी ती बांधली होती.

विहिरीची स्वच्छता प्रवीण चौगुले, किरण पोवार, भारत पोवार, सागर पोवार, शरद पवार, विजय पोवार, हैदर पटेल, फिरोज पटेल यांच्यासह युवकांनी केली.


मादळे येथील छत्रपती राजारामकालीन विहीर.


विहिरीवर राजाराम महाराजांचे नाव असणारी पाटी.


विहिरीसह परिसराची साफसफाई करताना युवक.